# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०२३

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शुक्रवार, दिनांक ०८ डिसेंबर, २०२३ / अग्रहायण १७, १९४५ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **उप मुख्यमंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **मृद व जलसंधारण मंत्री** | |
| **(३)** | **गृहनिर्माण, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** | |
| **(४)** | **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - २३**

---

### पिरकोन (ता. उरण, जि. रायगड) येथे रक्कम दुप्पट करण्याचे आमिष दाखवून नागरीकांची केलेली फसवणूक

**(१) * ७२१६४ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), अ‍ॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिरकोन (ता.उरण, जि.रायगड) येथील श्री.सतीश विष्णू गावंड या इसमाने गुंतवणुकीवर ३० ते ५० दिवसात रक्कम दुप्पट करण्याचे आमिष दाखवून नागरीकांची कोटयवधी रुपयांची फसवणूक केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुख्य आरोपी श्री.सतीश गावंड याने या कामाकरिता शेकडो एजंटची नेमणूक केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी श्री.सतीश गावंड यांस अटक करण्यात आली परंतु यातील अन्य आरोपींवर अद्याप कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त चिटफंड घोटाळ्याची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने सर्व दोषींवर कारवाई करुन फसवणूक झालेल्या नागरिकांच्या रकमेची परतफेड करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, सतीश गावंड या व्यक्तीने रु. ३५.६६ कोटी रुपयांची फसवणूक केल्याचे अद्यापपर्यंत झालेल्या पोलीस तपासामध्ये निष्पन्न झाले आहे.
(२) सदर प्रकरणी उरण पोलीस ठाणे आणि सीबीडी बेलापूर पोलीस ठाणे येथे नोंद करण्यात आलेल्या गुन्ह्यामध्ये एकूण ४२ एजंट नेमले असल्याचे पोलीस तपासामध्ये निष्पन्न झाले आहे.
(३) सदर प्रकरणी मुख्य आरोपी सतीश गावंड व इतर आरोपींविरुध्द उरण पोलीस ठाणे (गु.र.नं. ४१/२०२३) आणि सीबीडी बेलापूर पोलीस ठाणे (गु.र.नं. १५५/२०२३) येथे दोन स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. त्यापैकी, उरण पोलीस ठाणे येथे दाखल गुन्ह्यामधील मुख्य आरोपी सतीश गावंड सह एकूण ६ आरोपींना अटक करण्यात आली असून अन्य १४ आरोपींना मा. उच्च न्यायालय, मुंबई व २ आरोपींना मा.सत्र न्यायालय, पनवेल यांनी अंतरिम जामीन मंजूर केलेला आहे.
तसेच, सीबीडी बेलापूर पोलीस ठाणे येथे दाखल गुन्ह्यातील मुख्य आरोपी सतीश गावंड सह एकूण ३ आरोपींना अटक करण्यात आलेली असून इतर ९ आरोपींना मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी अटकपूर्व जामीन मंजूर केला असून उर्वरित आरोपींच्या विरोधात पुरावा उपलब्ध करून घेण्याबाबत पोलीसांकडून कार्यवाही सुरू आहे.
(४) उरण पोलीस ठाणे गुन्हा नोंद क्र. ४१/२०२३ या गुन्ह्यातील आरोपींनी ठेवीदारांकडून खरेदी केलेल्या मालमत्तेची ठेविदारांच्या हिताच्या दृष्टीकोनातून योग्य विल्हेवाट लावण्याकरिता महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम, १९९९ अन्वये सक्षम अधिकारी नियुक्त करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी, रायगड यांना आर्थिक गुन्हे शाखा, नवी मुंबई यांचेकडून कळविण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत चालविल्या जाणाऱ्या आश्रमशाळांचे अनुदान प्रलंबित असल्याबाबत

**(२) * ७२११३ श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.राजेश एकडे (मलकापूर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात इतर मागास बहुजन कल्याण विभागातंर्गत ११६७ आश्रमशाळा चालविल्या जात असून प्रत्येक आश्रमशाळेत किमान ३२० विद्यार्थी निवासी स्वरुपात शिक्षण घेत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आश्रमशाळेच्या संस्थांना सुमारे पावणेचार लाख विद्यार्थ्यांसाठी प्रतिविद्यार्थी दरमहा दीड हजार रुपये शासनाकडून अनुदान स्वरुपात दिले जाते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या आश्रमशाळांना दिले जाणारे शासकीय अनुदान मागील २-३ वर्षापासून देण्यात आले नसून सन २०१९-२० ते सन २०२२-२३ या आर्थिक वर्षातील अनुदानाचे टप्पे देखील संस्थांना मिळाले नसल्याचे दिनांक १ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रलंबित अनुदान तात्काळ वितरित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे :** (१) राज्यात इतर मागास बहुजन कल्याण विभागातंर्गत विजाभज प्रवर्गाच्या प्राथमिक ५२९, माध्यमिक ३०० व उच्च माध्यमिक १४८ अशा एकूण ९७७ खाजगी अनुदानित निवासी आश्रमशाळा चालविण्यात येतात. पैकी प्राथमिक आश्रमशाळेत (वर्ग १ ते ७) १२० विद्यार्थी, माध्यमिक आश्रमशाळेत (वर्ग ८ ते १०) १२० व उच्च माध्यमिक आश्रमशाळेत (वर्ग ११ वी १२ वी) ८० विद्यार्थी त्यानुसार प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक असे तीन विभाग (Unit) ज्या आश्रमशाळेत असतील तेथे ३२० विद्यार्थी निवासी शिक्षण घेत आहेत.
(२) होय, अंशत: खरे आहे. राज्यातील विजाभज प्रवर्गाच्या प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळांमध्ये १,०३,५१२ निवासी विद्यार्थ्यांना प्रती विद्यार्थी प्रती माह रु.१५००/- इतके परिपोषण अनुदान दिले जाते.
(३) व (४) होय, अंशत: खरे आहे.
सन २०१९-२० ते सन २०२२-२३ या कालावधीत क्षेत्रिय कार्यालयांच्या मागणीनुसार राज्यातील आश्रमशाळांना खालीलप्रमाणे वेतनेतर अनुदान अदा करणेत आले आहे.

| आर्थिक वर्ष | अर्थसंकल्पिय तरतूद (रु.कोटी) | सुधारीत अंदाज (रु.कोटी) | प्रत्यक्ष खर्च (रु.कोटी) |
|---|---|---|---|
| २०१९-२० | १४०.०० | १६५.०० | १३५.९३ |
| २०२०-२१ | २५५.०० | १७७.५० | १३६.०९ |
| २०२१-२२ | २५५.०० | १९१.२५ | १२०.०९ |
| २०२२-२३ | २००.०० | १४०.०० | १४०.०० |
| २०२३-२४ | २२५.०० | -- | ११०.०० |

सद्यस्थितीत कोकण, नाशिक अमरावती व नागपूर विभागात सन २०१९-२० ते २०२२-२३ या कालावधीतील सर्व विजाभज खाजगी अनुदानित आश्रमशाळांचे वेतनेतर अनुदान अदा करण्यात आले आहे.

तथापि, पुणे, लातूर व छत्रपती संभाजीनगर विभागातील काही आश्रमशाळांचे वेतनेतर अनुदान संबंधित संस्थाकडून मागील खर्चाचे विवरण (Assesment) विलंबाने सादर केल्याने व मंजूर निधी खर्च झाल्यामुळे प्रलंबित आहे. सदर अनुदान तातडीने अदा करण्यासाठी सन २०२३-२४ मध्ये अर्थसंकल्पीय निधीपैकी उर्वरित ५०% म्हणजेच रु.११२.५० कोटी वितरित करण्याबाबतचा प्रस्ताव वित्त विभागास सादर

करण्यात आला आहे. याशिवाय आगामी हिवाळी अधिवेशनात रु.२००.०० कोटी इतक्या रक्कमेची पुरक मागणी सादर करून निधी उपलब्ध करून घेण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**कोल्हापूर व सांगली येथील गुंतवणूकदारांची ए.एस.ट्रेडर्स व त्यांच्या अन्य कंपन्यांनी केलेली फसवणूक**

**(३) * ७१६५५ श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.राजु (बाबा) जयवंतराव आवळे (हातकणंगले) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ए.एस.ट्रेडर्स व त्यांच्या अन्य कंपन्यांनी कमी कालावधीत जास्त नफा, विदेशी सहल, वाहने व भेटवस्तु अशा प्रकारची आमिषे दाखवून कोल्हापूर व सांगली परिसरातील गुंतवणूकदारांची सुमारे दीड हजार कोटी रुपयांची फसवणूक केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ए.एस.ट्रेडर्स व त्यांच्या अन्य कंपन्यांविरोधात माहे नोव्हेंबर २०२२ मध्ये पोलिस ठाण्यात लेखी तक्रार देऊन गुन्हा दाखल असतानाही तपास करणाऱ्या पोलिस अधिकाऱ्यांनी तपासाकरिता विलंब लावून त्याकडे दुर्लक्ष करून संशयित आरोपींना विदेशात पळून जाण्यास मदत केली असल्याचे दिनांक २२ ऑक्टोंबर २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित कंपन्या व जबाबदार अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) प्रश्नाधीन घटनेनुसार सांगली जिल्ह्यात फसवणुक झाल्याची बाब निदर्शसनास आली नाही. कोल्हापूर जिल्ह्यात अशी घटना घडल्याचे निदर्शनास आले असून आजस्थितीत एकुण ३९८ गुंतवणुकदारांची रु.४०,४६,११,९२३/- इतकी फसवणुक झाल्याचे निष्पन्न झाले आहे.
(२) हे खरे नाही.

सदर गुन्ह्याची व्याप्ती मोठी असून गुन्ह्याचे कार्यक्षेत्र महाराष्ट्रासह परराज्यामध्ये तसेच विदेशापर्यंत आहे. गुन्ह्याच्या तपासाच्या अनुषंगाने विविध बँका, आर्थिक संस्था, कार्यालये व साक्षीदार यांचेकडून माहिती प्राप्त करण्यासाठी जास्त कालावधी लागत असला तरी गुन्ह्याचा तपास सुरळीतपणे व प्रथम प्राधान्याने पोलीसांकडून करण्यात येत आहे. त्यामुळे पोलीस अधिकाऱ्यांनी तपासाकरिता विलंब लावून दुर्लक्ष करुन संशयीत आरोपींना पळून जाण्यास मदत केली आहे हे म्हणणे वस्तुस्थितीस धरुन नाही.

(३) सदर प्रकरणी दाखल गुन्ह्यामध्ये आजस्थितीत तपासात एकुण ३५ आरोपी निष्पन्न झाले असून त्यापैकी १३ आरोपींना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्ह्यातील आरोपींविरुध्द मा.न्यायालयात दि.१७.०५.२०२३ रोजी दोषारोपत्र दाखल करण्यात आले आहे. सदर गुन्ह्यामध्ये ३९८ गुंतवणुकदारांची रु.४०,४६,११,९२३/- इतकी फसवणुक झाली असून आरोपींकडून रु.२,००,६१,५७०/- इतक्या किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तसेच गुन्ह्यामध्ये आरोपींकडून जप्त करण्यात आलेल्या लॅपटॉप, मोबाईल व इतर साधनांव्दारे आरोपींविरुध्द सबळ पुरावे गोळा करण्यात येत असून गुन्ह्याचा पुढील तपास पोलीसांकडून सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मौजे आशागड, निंबळपाडा (ता.डहाणू, जि.पालघर) येथील आदिवासी कुटुंबास अवास्तव वीज देयके आकारल्याबाबत**

**(४) * ७१८०३ श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्ह्यातील आशागड, जमशेत, सरवली, कैनाड, कासा, चारोटी, सायवन, किन्हवली, दाभाडी दिवशी इत्यादी भागात आदिवासी घरकुलांना अवास्तव घरगुती वीज देयके आकारण्यात आल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आशागड, निंबळपाडा (ता.डहाणू,जि.पालघर) येथील आदिवासी कुटुंबास रु.१ लाख २५ हजार रुपयांचे वीज देयक आकारण्यात आल्याचे माहे सप्टेंबर २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त भागांतील आदिवासी समाजाकडून प्रस्तुत प्रकरणी तात्काळ कार्यवाही करण्याची मागणी करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) बाबत, महावितरण कंपनीने माहे ऑगस्ट-सप्टेंबर, २०२३ मध्ये वीज ग्राहकांना अचूक वीज देयक मिळण्यासाठी डहाणू उपविभागातील आशागड, जामशेत, सरावली, कन्नाड, कासा, चारोटी, सायवन, किन्हवली, दाभाडी, दिवशी इ. भागात ग्राहकांचे १०० टक्के मीटर रिडींग घेण्यासाठी विशेष मोहीम राबविली होती. या मोहीमेअंतर्गत आशागड, निंबळपाडा येथील वीज ग्राहक श्री.रमेश गोरखाना यांना माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये संचलित युनिटचे एकूण रु. १,०५,६५०/- इतक्या रक्कमेचे वीज देयक मीटर रिडींगनुसार देण्यात आले होते.

याव्यतिरिक्त, महावितरण कंपनीच्या इतर सर्व वीज ग्राहकांना दर महिन्याला त्यांच्या मीटर रिडींगप्रमाणे वीज देयक आकारले आहे. तसेच, ज्या ग्राहकांचे मीटर रिडींग उपलब्ध होत नाही अशा ग्राहकांना मा.महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाच्या नियमाप्रमाणे त्यांच्या मागील सरासरी वीज वापरानुसार वीज देयक आकारण्यात येते.

(३) हे खरे आहे.

(४) सदर ग्राहकाच्या तक्रारीनुसार प्रत्यक्ष स्थळपाहणी करण्यात आली असून, सदर वीज ग्राहकास रु.२८,६५०/- रक्कमेचे सुधारीत वीज देयक दुरुस्त करुन देण्यात आलेले आहे. त्यानुसार, ग्राहकाने वीज देयकाचा रु. ५०००/- इतक्या रकमेचा पहिला हप्ता दि.१२.१०.२०२३ मध्ये भरणा केला आहे.

याबाबत, महावितरण कंपनीमार्फत मीटर रिडिंग घेणाऱ्या एजन्सीला दरमहा अचूक रिडिंग न घेण्याबाबत माहे एप्रिल २०२३ ते सप्टेंबर २०२३ या आर्थिक वर्षात मीटरचा फोटो बरोबर न आणणे, चुकीचे मीटर रिडिंग घेणे, रिडिंग वेळेवर ॲपमध्ये न टाकणे, वीज देयक बरोबर वितरण न करणे, इत्यादी कारणाने एकूण रु. २,४६,०२५/- दंड आकारणी केली आहे. तसेच, संबंधित मीटर रिडींग करणाऱ्या कर्मचाऱ्यास दि.२१.११.२०२३ रोजी कामावरुन कमी करण्यात आले आहे.

तसेच कामात कुचराई केल्यामुळे महावितरणचे डहाणू उप विभागातील सहाय्यक लेखापाल यांच्यावर महावितरण कंपनीमार्फत शिस्तभंगाची कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अप्पर वर्धा (ता.मोर्शी, जि.अमरावती) येथील धरणग्रस्तांनी त्यांच्या मागण्यांसाठी मंत्रालयातील संरक्षक जाळीवर उडया मारुन केलेले आंदोलन

**(५) * ७१९५३ डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अप्पर वर्धा (ता.मोर्शी, जि.अमरावती) येथील धरणग्रस्तांना जमिनीच्या मोबदल्याच्या फरकाची रक्कम व्याजासह मिळावी, शेतकऱ्यांना पुनर्वसन कायद्यानुसार दिली जाणारी जमिन लाभक्षेत्रात मिळावी, प्रकल्पग्रस्तांना शासकीय व निमशासकीय सेवेत सामावून घेण्यात यावे, यासाठी आरक्षणाची मर्यादा ५ वरुन १५ टक्के करण्यात यावी किंवा प्रत्येकास २० ते २५ लाख सानुग्रह अनुदान द्यावे इत्यादी मागण्यांसाठी सुमारे १०३ दिवसांपासून प्रकल्पग्रस्तांचे उपोषण सुरु होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रकल्पबाधित शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांकडे शासनाचे दुर्लक्ष झाल्यामुळे काही प्रकल्पग्रस्तांनी माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान मंत्रालयातील संरक्षक जाळीवर उडया मारुन आंदोलन केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधी (संगमनेर) यांनी जलसंपदा मंत्री महोदयांकडे प्रकल्पग्रस्तांच्या मागण्यांचे निवेदन दिनांक १ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

या बाबत दिनांक १५.०५.२०२३ पासुन मोर्शी मुख्यालयी प्रकल्पग्रस्तांचे साखळी आंदोलन सुरु आहे.

(२) होय, हे अंशत: खरे आहे.

दिनांक ३१.०८.२०२३ रोजी मंत्रालय मुंबई येथे आंदोलन करण्यात आले.

(३) होय, हे खरे आहे..

(४) या अनुषंगाने अप्पर मुख्य सचिव ( जलसंपदा ) यांच्याकडे दिनांक २७.०९.२०२३ रोजी बैठक झाली. व सदर बैठकीमध्ये प्रस्तुत सर्व बाबी बाबत संबंधित जिल्हाधिकारी व मुख्य अभियंता, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ यांनी पाठपुरावा करुन तात्काळ अद्ययावत माहिती सादर करावी असा निर्णय घेण्यात आला.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर महाऔष्णिक वीज केंद्रातील निविदा प्रक्रियेत झालेली अनियमितता

**(६) * ७३०६१ श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर महाऔष्णिक वीज केंद्रातील विविध कामांच्या निविदा प्रक्रियेत गैरव्यहार झाला असुन एकाच कंत्राटदारास कोट्यवधी रुपयांची कामे दिली जात असल्याचे माहे सप्टेंबर २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने निविदा प्रक्रियेत स्पर्धा होऊ न देता एकाच कंत्राटदारास कामे मिळवून देणाऱ्या संबंधित अधिकारी व कंत्राटदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही;

चंद्रपूर महाऔष्णिक वीज केंद्रातील देखभाल व दुरुस्तीची कामे करण्याकरिता खुल्या निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे खरेदी प्रक्रिया, महानिर्मिती कंपनीचे खरेदी धोरण व महाराष्ट्र शासनाच्या खरेदी नियमांचे पालन करून, स्पर्धात्मक व पारदर्शक पद्धतीने कंत्राटे काढली जातात. यानुसार पात्रता निकषांमध्ये समाविष्ट केलेल्या तांत्रिक-व्यावसायीक अटी व शर्तींची पूर्तता केल्यानंतर पात्र झालेल्या निविदाधारकांचे दरपत्रक उघडले जाऊन त्यानुसार, कमीतकमी दराने बोली लावणाऱ्या कंत्राटदारास कार्यादेश पारीत करण्यात आले आहेत.

चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत निर्मिती केंद्र, चंद्रपूर येथून माहे सप्टेंबर २०२३ मध्ये एकंदरीत ५४ निविदांचे आदेश ४२ कंत्राटदारांना पारित करण्यात आले. यात काही निविदाधारकांना एका पेक्षा जास्त आदेश मिळालेले आहेत. मात्र त्यांना ते कार्यादेश स्पर्धात्मक पध्दतीने कमीतकमी दराने (एल १ आधारावर) बोली लावल्यामुळे प्राप्त झालेले आहेत.

चंद्रपूर जिल्ह्यातील चंद्रपूर सुपर थर्मल पॉवर स्टेशन येथील विविध कामांच्या निविदा प्रक्रियेत कोणताही गैरव्यवहार झालेला आहे, असे म्हणणे संयुक्तीक ठरणार नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मौजे बाभळगाव (ता.पायरी,जि.जालना) येथे बांधण्यात आलेल्या बंधाऱ्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(७) * ७३४५९ श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाथरी (जि.जालना) तालुक्यात जलसंधारण विभागामार्फत कोल्हापूर पध्दतीने बांधण्यात आलेल्या २३ बंधाऱ्यांचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच बंधाऱ्यांच्या निकृष्ट कामांमुळे विशेषत: बाभळगाव येथे पाणी अडत नसल्याने शासनाच्या कोट्यवधी रुपयांचे व शेतकऱ्यांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे माहे ऑक्टोबर,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन बंधाऱ्याची दुरुस्ती करुन संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड :** (१) हे खरे नाही.

सदरील २३ कामापैकी १६ द्वारयुक्त सिमेंट बंधारे व १ को.प.बंधारा असे एकूण १७ कामे निविदेतील अटी व शर्थीनुसार भौतिकदृष्ट्या पूर्ण करण्यात आलेली आहेत. उर्वरित ०६ को.प.बंधाऱ्याची कामे प्रगतीपथावर आहेत व १ काम अद्याप चालू झालेले नाही. तसेच या कामाची आवश्यकतेनुसार गुणनियंत्रण चाचणी निष्कर्ष घेण्यात येत आहे. सदरील कामे निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत तक्रार आजपर्यंत प्राप्त झालेली नाही.

(२) हे खरे नाही.

मौजे बाभुळगाव येथील को.प.बंधाऱ्याचे बांधकाम भौतिकदृष्ट्या पूर्ण झालेले आहे. तसेच को.प.बंधाऱ्याचे दरवाजे बसविण्यासाठी जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग,

परभणी यांनी संबंधित कंत्राटदारास लेखी पत्र दिले आहे. दरवाजे बसविण्याचे देयक संबंधित कंत्राटदारास अदा करण्यात आलेले नाही. त्यामुळे शासनाचे कुठलेही आर्थिक नुकसान झालेले नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**महर्षी विठ्ठल रामजी शिंदे (ता.मोखाडा, जि.पालघर) येथील अनुदानित आश्रम शाळेतील विद्यार्थिनीची झालेली हत्या**

**(८)** * **७६८८५ डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रयत शिक्षण संस्थेच्या महर्षी विठ्ठल रामजी शिंदे (ता.मोखाडा, जि.पालघर) प्राथमिक / उच्च माध्यमिक अनुदानित आश्रम शाळेतील विद्यार्थिनीची भर दिवसा गळा चिरून हत्या करण्यात आल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन आश्रमशाळेतील विद्यार्थीनींना सुरक्षितता पुरविणे तसेच संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाचे कारणे आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी मोखाडा पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.१६९/२०२३ भादवि कलम ३०२, दि.०६.१०.२०२३ नोंद करण्यात आला आहे. मयत विद्यार्थिनीची हत्या केल्यानंतर आरोपी प्रकाश वाघरे याने आत्महत्या केल्याचे पोलीसांच्या निदर्शनास आल्याने मृत्यु रजि. क्र.३०/२०२३ सीआरपीसी १७४ प्रमाणे आकस्मात मृत्युची नोंद करण्यात आली आहे.

पालघर पोलीस दलामार्फत राबविण्यात येणाऱ्या "जनसंवाद अभियानांतर्गत" समुपदेशन मेळाव्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना कायदेविषयक ज्ञान, गुड टच, बॅड टच, व्यसनमुक्ती याबाबत मार्गदर्शन करण्यात येत आहे तसेच प्रत्येक महाविद्यालयात कोणत्याही प्रकारची काही अडचण उद्भ्दवल्यास पोलीसांपर्यंत पोहचण्यासाठी व्हॉटसअप ग्रुप तयार करण्यात आले आहेत. प्रत्येक महाविद्यालयात एक तक्रार पेटी ठेवण्यात आली आहे व त्याची वेळोवेळी दखल घेऊन कारवाई करण्यात आलेली आहे. तसेच महिलांवरील अत्याचारांना प्रतिबंध करण्यासाठी पालघर जिल्ह्यात दामिनी/निर्भया पथकाची स्थापना करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**कल्याण (जि.ठाणे) येथील नर्सिंग प्रशिक्षण संस्थेने प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांची केलेली फसवणूक**

**(९)** * **७६१२५ श्री.संतोष बांगर (कळमनुरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (पश्चिम) येथील झुंजारराव कॉम्प्लेक्समधील उडान संस्थेच्या विश्वकर्मा सिटी ऑफ सेल्फ एम्प्लॉयमेंट सेंटरमध्ये शासन मान्यताप्राप्त नर्सिंग कोर्सच्या नावाखाली ४० प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांकडून

प्रत्येकी पावणेदोन लाख रुपये घेऊन कोर्स पूर्ण झाल्यानंतर देण्यात आलेले सर्टिफिकेटही बनावट असल्याचे दिनांक ४ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर संस्थेने गत ३ वर्षांत सेवा शुल्काद्वारे ३८ विद्यार्थिनींकडून प्रत्येकी १ लाख ७५ हजार ते २ लाखांहून अधिक रक्कम घेऊन सुमारे ५२ लाख २१ हजार इतक्या रकमेची फसवणूक केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी उडानचे संचालक श्री.वरुण झा, श्री.राहुल झा आणि संस्थेच्या शाखा प्रमुख श्रीमती प्रिती सोरटे यांच्यावर महात्मा फुले पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची शासनाने सखोल चौकशी करुन फसवणूक झालेल्या विद्यार्थ्यांची रक्कम परत करुन या प्रकरणातील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) होय.

सदर प्रकरणी संबंधीत आरोपींविरुद्ध महात्मा फुले चौक पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. नंबर ५५७/२०२३, भादंवि कलम ४२०, ४०६, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ३४ अन्वये दि.०७.१०.२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याच्या तपासादरम्यान एकूण ५५ विद्यार्थ्यांकडून रु.७१,६२,२२५/- इतकी रक्कम फी स्वरुपात स्विकारुन फसवणूक केल्याचे निष्पन्न झाले आहे. सदर गुन्ह्यातील श्री. वरुण झा व श्रीमती प्रिती सोरटे या दोन आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. तपासादरम्यान आरोपीत नामे श्री. राहुल झा याचा सदर गुन्ह्यात सहभाग नसल्याचे दिसून येत असल्याने त्यास अद्याप अटक करण्यात आलेले नाही.
(४) सदर गुन्ह्याचा तपास चालू असून सध्या आरोपी न्यायालयीन कोठडीत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मराठवाड्यातील छत्रपती शिवाजी महाराज सेवाभावी संस्थेने केलेली फसवणूक

**(१०) * ७१८६६ श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा), श्रीमती मंजुळा गावीत (साक्री) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मराठवाड्यातील छत्रपती शिवाजी महाराज सेवाभावी संस्थेने नांदेड, हिंगोली तसेच जिल्ह्यातील जवळपास लाखो नागरिकांची तब्बल १०० कोटी रूपयांची फसवणुक केल्याप्रकरणी वजिराबाद पोलिस ठाण्यात दिनांक ३० ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास गुन्हा नोंदविला आहे, हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन फसवणूक करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत तसेच नागरीकांची रक्कम परत मिळण्याच्या दृष्टिने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) प्रश्नाधीन घटनेनुसार हिंगोली जिल्ह्यात फसवणुक झाल्याची बाब निदर्शसनास आली नाही. नांदेड जिल्ह्यात अशी घटना घडल्याचे निदर्शनास आले आहे. यामध्ये शासकीय योजनेतून माफक दरामध्ये विविध वस्तुंचे वाटप करण्यात येत असल्याचे खोटे प्रचार व प्रसार करुन अशा प्रकारची

प्रलोभने दाखवून एकुण ९८३१ गुंतवणुकदारांची रु.१,१४,११,७००/- इतक्या रकमेची फसवणुक झाल्याचे दि.२९.०८.२०२३ रोजी निष्पन्न झाले आहे.

(२) सदर घटनेच्या अनुषंगाने फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन वजिराबाद पोलीस स्टेशन, नांदेड येथे गु.र.नं.३७४/२०२३ भा.दं.वि.कलम ४०६, ४०९, ४२०, १२० (ब), शस्त्र अधिनियम ३/२५ तसेच एमपीआयडी अधिनियम सहकलम ३, ४ प्रमाणे दि.२९.०८.२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्यात एकुण १३ आरोपी निष्पन्न झाले असून ३ आरोपींना दि.३०.०८.२०२३ रोजी अटक करण्यात आले आहे. सदर ३ आरोपी न्यायालयीन कोठडीत आहेत. तसेच गुन्ह्यातील १० फरार आरोपींचा शोध घेणे सुरु असून गुन्ह्यामध्ये आरोपींकडून जप्त करण्यात आलेल्या लॅपटॉप, मोबाईल, रबरी गोल स्टॅम्प, लाभार्थी सभासद फॉर्म, पी.आर.ओ. यांना देण्यात आलेले पिवळ्या रंगाचे कार्ड व इतर साहित्याच्या आधारे अधिक पुरावा गोळा करण्याचे काम सुरु आहे. तसेच गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे.

सदर गुन्ह्यातील आरोपीतांच्या मालमत्तेची माहिती हस्तगत करुन महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थामधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम, १९९९ (एम.पी.आय.डी.ॲक्ट) प्रमाणे पुढील कार्यवाही पोलीसांमार्फत करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सोलनपाडा (ता.कर्जत, जि.रायगड) धरणाच्या दुरुस्तीचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(११) * ७१८४० श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेतीसाठी वरदान असलेल्या सोलनपाडा (ता.कर्जत, जि.रायगड) धरणाला मोठया प्रमाणात गळती लागल्याने धरण फुटून मोठी दुर्घटना होण्याची शक्यता असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन १९८० मध्ये बांधलेला सदरहू पाझर तलाव सन २००९ मध्ये फुटलेला असून ५ कोटी रुपयांचा निधी खर्च करुन याची दुरुस्ती करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मोठ्या प्रमाणात निधी खर्च करुन केलेले दुरुस्तीचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्यामुळे सदरहू पाझर तलावातून पुन्हा मोठ्या प्रमाणात गळती सुरु झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जिल्हाप्रशासनाने तातडीने धरणाची पाहणी करून सोलनपाडा गावातील ग्रामस्थांची विजयभूमी विद्यापीठाच्या संकुलात तात्पुरती व्यवस्था केली आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन पाझर तलावाची तात्काळ दुरुस्ती करुन ग्रामस्थांचे कायमस्वरुपी पुनर्वसन करण्याबाबत तसेच संबधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड :** (१) हे खरे नाही,

कर्जत तालुक्यातील सोलनपाडा जामरुंग या तलावास सद्यस्थितीत धोका असल्याचे दिसून येत नाही. तथापि, तलावामधील होत असलेली गळती व त्यानुषंगाने दुरूस्तीची आवश्यकता विचारात घेवून मुख्यमंत्री जलसंवर्धन योजने अंतर्गत तलावाच्या दुरूस्तीचे काम हाती घेण्यात आले आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

सन २००९ मध्ये पाझर तलाव फुटण्याची बाब निदर्शनास आली नसल्याने सदर वर्षात दुरूस्ती करण्यात आलेली नाही.

तथापि, नजीकची ल.पा.योजना डोंगरपाडा ही योजना दि.२१.०७.२०११ रोजी फुटल्याने अशा प्रकारच्या अपघाताची पुनरावृत्ती होऊ नये व नैसर्गिक आपत्ती टाळण्याच्या दृष्टीकोनातून दि.२७.०७.२०११ रोजी अधीक्षक अभियंता, ल.पा.(स्था.स्तर) मंडळ ठाणे यांनी जामरुंग सोलनपाडा ल.पा.योजनेचे पाहणी करुन मजबुतीकरण व दुरूस्ती कामे सुचविली होती. त्यानुसार सदर तलावाचे मजबुतीकरण व दुरूस्ती करण्यात आली असून सदर कामावर रक्कम रु.१४५५ लक्ष एवढा खर्च राष्ट्रीय कृषी विकास योजनेमधून झाला आहे.

(३) हे खरे नाही.

सन २०१२-१३ मध्ये प्रामुख्याने धरणाच्या मजबुतीकरणाचे व विमोचक नव्याने बांधकाम करण्याचे काम करण्यात आलेले होते. सदर तलावाचे मजबुतीकरण व दुरूस्तीचे काम पूर्ण झाल्यामुळे धरणाचा पाणीसाठा २३८.२२ स.घ.मी. ने वाढून सुधारीत पाणीसाठा ८८२.९८ स.घ.मी इतका झालेला आहे. तसेच सिंचन क्षमता ३६.४४ हेक्टर वरुन सुधारीत सिंचन क्षमता ७५ हेक्टर एवढी झालेली आहे. तसेच त्यानंतर सन २०१९ पर्यंत गळती आढळून आलेली नाही.

त्यानंतर सन २०१९ मध्ये धरणाच्या खालील बाजूस वाढलेली झाडे व झुडपे साफ करत असताना तलावाच्या पहिल्या व दुसऱ्या बर्म मधून काही प्रमाणात गळती होत असल्याचे निदर्शनास आल्यामुळे दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले आहे.

(४) होय, हे खरे आहे.

दि.२० जुलै ते २२ जुलै, २०२३ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे तलाव धोक्याच्या पातळीवरून वाहत होता. त्यामुळे प्रतिबंधात्मक सुरक्षा उपाययोजने अंतर्गत स्थानिक ग्रामस्थांना सुरक्षित ठिकाणी विजयभूमी विद्यापीठाच्या संकुलात तात्पुरती स्थलांतरित करण्याची कार्यवाही पूर्ण करण्यात आली होती.

(५) प्रस्तुत प्रकल्पाचे दुरूस्तीचे काम मुख्यमंत्री जलसंवर्धन योजने अंतर्गत हाती घेण्यात आले आहे. सदर योजनेचे दुरूस्तीचे काम दि.१५ एप्रिल, २०२३ रोजी सुरु करण्यात आलेले असून ग्रामस्थांच्या कायमस्वरुपी पुनर्वसनाची आवश्यकता नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वाढवण बंदर (जि.पालघर) येथे जमिनीला पाचपट भाव देण्याचे आमिष दाखवून शेतकऱ्यांची केलेली फसवणूक

**(१२) * ७२६८४ श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.शिरीष चौधरी**

**(रावेर) , श्री. विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाढवण बंदर (जि. पालघर) पूर्ण झाले तर जमिनीला पाच पटीने भाव मिळेल अशा प्रकारचे आमिष दाखवून शेतकऱ्यांच्या जमिनी हडप करण्याचे प्रकार नुकतेच निदर्शनास आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा प्रकारच्या अनेक गुन्ह्यांमध्ये एका शेतकऱ्याच्या जमिनीचे दोन-दोन साठेकरार करुन फसवणुक करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात नौपाडा पोलीस स्टेशन, ठाणे येथे गुन्हयांची नोंद करण्यात आली असून गुन्हेगारांची नावे माहीत असूनही त्यांना अद्यापही अटक करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन आरोपींना अटक करण्याबाबत तसेच फसवणूक झालेल्या शेतकऱ्यांना जमिनी परत मिळवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय. हे खरे आहे.

(३) व (४) सदर प्रकरणी नौपाडा पोलीस स्टेशन, ठाणे येथे गु. र.क्र. २४२/२०२३ भादवि कलम ४०६, ४२०, ४६७, ४६८, ४६९, ४७१, ३४, दि.१२.०८.२०२३ अन्वये नोंद करण्यात आली आहे. सदर प्रकरणी ६ आरोपींना सीआरपीसी कलम ४१ (अ) (१) प्रमाणे नोटीस बजावण्यात आली असून सदर प्रकरणाचा तपास चालू आहे. सदर प्रकरणातील आरोपी व शेतकरी यांच्यात करण्यात आलेला साठेकरार हा तात्पुरत्या स्वरुपातील असल्याने सदर जमिनींवर अद्याप शेतकऱ्यांचाच ताबा असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भिंवडी (जि.ठाणे) येथे टोरंट वीज कपंनीने केलेला गैरव्यवहार

**(१३) * ७१७९२ श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्रीमती ऋतुजा लटके (अंधेरी पूर्व), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.संजय जगताप (पुरंदर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) येथे टोरंट वीज कंपनीद्वारे सर्वसामान्य वीजग्राहक व उद्योजक यांना अवाजवी वीज देयके पाठविणे, कधीही वीज खंडीत करणे तसेच थकबाकीसाठी तगादा लावणे इत्यादी प्रकारांमुळे भिवंडीतील नागरिक त्रस्त झाले असल्याचे दिनांक २ ऑक्टोंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने कारवाई करुन सदर कंपनीला हद्दपार करण्याची मागणी नागरिक, सेवाभावी संस्था तसेच लोकप्रतिनिधी यांच्यामार्फत करण्यात येऊनही अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) महावितरणच्या भिवंडी मंडळांतर्गत वीज वितरण व देखभाल व्यवस्था फ्रॅन्चाइझी तत्वावर दि. २६.०१.२००७ पासून मे.टोरंट पॉवर कंपनी लि. यांचेकडे हस्तांतरीत करण्यात आलेली आहे. सदर वितरण फ्रॅन्चाइझी विभागात वीज वितरण फ्रॅन्चाइझी करारातील तरतुदींनुसार मे.टोरंट पॉवर कंपनीमार्फत कामकाज करण्यात येते.

मा.महाराष्ट्र वीज नियामक आयोगाच्या बहुवार्षिक वीज दर याचिका आदेशानुसार (MYT Tariff Order) वीज दर निश्चित केले जातात. सदर वीजदर निश्चितीबाबत महावितरण कंपनी अथवा मे.टोरंट पॉवर कंपनीला कोणतेही अधिकार नाहीत. महावितरणच्या ग्राहकास लागू असलेल्या दराप्रमाणेच भिंवडी वितरण फ्रॅन्चाइझी विभागातील सर्व ग्राहकांना वीज देयके दिली जातात.

माहे ऑक्टोबर, २०२३ दरम्यान मे.टोरंट पॉवर कंपनी लि. कंपनीव्दारे जास्त दराने वीज देयके देण्यात येतात, कधीही वीज खंडीत करतात व थकबाकीसाठी तगादा लावण्यात येतो अशा आशयाच्या तक्रारी काही लोकप्रतिनिधींकडून प्राप्त झाल्या आहेत.

(३) याअनुषंगाने, महावितरण कंपनीमार्फत दि.१५.०९.२०२३ रोजीच्या आदेशान्वये मुख्य अभियंता, भांडूप शहर परिमंडळ यांचे अध्यक्षतेखाली चौकशीसाठी त्रिसदस्यीय समिती गठीत करण्यात आली होती.

सदर समितीने त्यांचा अहवाल दि.०६.१०.२०२३ रोजी पत्रांन्वये महावितरण कंपनीस सादर केला आहे. सदर अहवालानुसार समितीने सर्व वर्गवारीतील नमूना वीज देयकाची पडताळणी केली असून, सर्व वर्गवारीच्या वीज ग्राहकांची वीज बीले मा.महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाने ठरवून दिलेल्या दरांप्रमाणेच वीज देयक आकारण्यात येत असल्याचे तसेच त्यामध्ये कोणत्याही प्रकारची अनियमितता आढळून आली नसल्याचे अहवालात नमूद केले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वैजापूर (जि.छत्रपती संभाजीनगर) तालुक्यातील जांबरगाव टोलनाक्याजवळ टेम्पो-ट्रॅव्हलची ट्रकला धडक होऊन झालेला अपघात

**(१४) * ७१७०२ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.रवींद्र धंगेकर**

**(कसबापेठ), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर मुंबई समृध्दी महामार्गावर वैजापूर (जि.छत्रपती संभाजीनगर) तालुक्यातील जांभरगाव टोलनाक्याजवळच्या अगरसायगाव शिवारात टेम्पो-ट्रॅव्हलर आणि ट्रकमध्ये झालेल्या भीषण अपघातात १२ प्रवासी ठार आणि २३ प्रवासी जखमी झाल्याची दुर्दैवी घटना दिनांक १४ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्या सुमारास घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी करुन समृध्दी महामार्गावरील वाढते अपघात रोखण्यासंदर्भात तसेच अपघातातील मृत व जखमींच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

सदर अपघातात १३ प्रवाशांचा मृत्यू झाला असून २२ प्रवासी जखमी झाले आहेत.

(२) समृध्दी महामार्गावर होणाऱ्या अपघातांवर प्रतिबंध व्हावा तसेच अपघात होऊ नये यासाठी महामार्ग पोलीस विभागाकडून तसेच संबंधित विभाग जसे की, MSRDC, RTO, NHAI SHAI, PWD यांचेशी संपर्क साधून अपघात कमी करण्याच्या अनुषंगाने महामार्ग पोलीस विभागांकडून समृध्दी महामार्गावर अपघात रोखण्यासाठी करण्यात आलेल्या उपाययोजना :-

१) MSRDC कडून पुरविण्यात आलेल्या वाहनांद्वारे गस्त करणे, इंटरसेप्टर वाहनांद्वारे अतिवेगाने जाणाऱ्या वाहनांवर, नो पार्किंग वाहने महामार्गावर विनाकारण थांबणे, विरुद्ध दिशेने वाहन चालवणे, ब्रेथ ॲनालायझरद्वारे दारू पिऊन वाहन चालविणाऱ्या वाहन चालकांवर कारवाई करण्यात येते.

२) समृध्दी महामार्गावरील इंटरचेंज पॉईंटजवळ ट्रॅव्हलची तपासणी करण्यात येत असून अग्नीशमन यंत्र, ड्रायव्हींग लायसन्स व परमीटची पाहणी करण्यात येऊन वाहन पुढील प्रवासास योग्य आहे की नाही याची खातरजमा करून महामार्गावर सोडण्यात येते.

३) समृद्धी महामार्गावरील टोल नाक्यावर वाहतूकीविषयी जनजागृती करण्यात येत असून वाहन वेग मर्यादा पाळणे, लेन कटींग, वाहनांचे टायर कंडीशनबाबत तसेच त्यामध्ये नायट्रोजन हवा भरणेबाबत प्रबोधन करण्यात येते.

४) वैजापूर येथे घडलेल्या अपघातामध्ये ट्रॅव्हल्समध्ये अतिरिक्त लोक प्रवास करीत होते. त्याअनुषंगाने समृद्धी महामार्गाच्या एन्ट्री पॉईंटला वाहनचालक तसेच वाहनांची तपासणी करून अतिरिक्त प्रवासी नसल्याची खात्री केली जाते, तसेच वाहनांची सद्यस्थिती, टायरगेज, प्रेशरगेज यांची तपासणी केली जाते.

५) समृद्धी महामार्गावर अपघात झाल्यानंतर अपघातग्रस्तांना वेळेवर गोल्डन अवर्समध्ये मदत मिळण्यासाठी स्थानिक लोकांमधून ३६०० मृत्यूंजय दूत तयार करण्यात आले असून त्यांना मृत्युंजय दूत म्हणून आयकार्ड देण्यात आले आहेत. मृत्युंजय दूत योजनेतून आतापर्यंत १८०० लोकांना वाचविण्यात यश आले आहे.

६) समृद्धी महामार्गावर अपघात प्रवण क्षेत्र (Black Spot) यांचे निकषांनुसार यादी तयार करून त्याठिकाणी रमलर्स लावणे, साईन बोर्ड, आवश्यकतेनुसार स्पीड ब्रेकर, कलर फलक लावणे जेणे करून वाहन चालक यांना रोड हिपनोसिस होणार नाही व त्यामुळे अपघात कमी होतील.

७) समृध्दी महामार्गावर वेळोवेळी उपलब्ध वाहनातून पी. ए. सिस्टीम द्वारे वाहन चालकांना लेन मधुन चालणे, वाहन मर्यादित वेगात चालविणे, सिट बेल्ट वापरणे, याविषयी सुचना दिल्या जातात.

८) ज्या ठिकाणाहून जंगली प्राणी महामार्गावर येतात त्याठिकाणी सुरक्षिततेच्या दृष्टीने जाळी लावण्यात आली आहे.

९) महामार्ग सुरक्षा पथक व एम एस आर डी सी यामध्ये समन्वय साधून समृध्दी महामार्गावर एकूण १५ ठिकाणी महामार्ग पोलीस केंद्र बांधण्यात येत आहेत.

१०) तसेच समृध्दी महामार्गावर सेल्फ स्पीड कॅमेरे, अग्नीशमन केंद्र, चालक विश्रांती गृह, सीसीटीव्ही कॅमेरे, नो पार्किंग बोर्ड लावणे, वेग मर्यादा फलक, वाहतूक नियम फलक, हेल्पलाईन फलक याबाबत संबंधित विभागास पत्रव्यवहार करून त्याचा वेळोवेळी पाठपुरावा करून उपाययोजना केल्या जातात.

सदर प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास सुरू आहे.

अपघातात मृत झालेल्या व्यक्तींच्या कुटुंबियांना प्रत्येकी रू.५ लाख याप्रमाणे अर्थसहाय्य मंजूर करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील शाळांच्या परिसरात तंबाखूजन्य पदार्थांची विक्री होत असल्याबाबत

**(१५) * ७१७९३ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.महेश बालदी (उरण), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.राजेश एकडे (मलकापूर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.विक्रमसिंह सावंत (जत) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शाळांच्या १०० मीटर परिसरात गुटखा, अमली तसेच तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करण्यास मनाई असतानाही राज्यात अनेक ठिकाणी राजरोसपणे या पदार्थांची अवैधरित्या विक्री सुरु असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे , हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विशेषत: मुंबई, रायगड, पुणे जिल्ह्यात शाळांच्या प्रवेशद्वारासमोरील टपऱ्यांवरच हे पदार्थ विकले जात असल्यामुळे मोठ्या प्रमाणात शाळकरी मुले याच्या आहारी जात आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तब्बल १२ यंत्रणांना तंबाखूजन्य पदार्थांच्या अवैध विक्रीविरोधात कारवाई करण्याचे अधिकार असतानाही सर्वच यंत्रणांकडून या प्रकरणी अपेक्षित कारवाई होत नसल्याने या पदार्थांची सर्रास विक्री होताना दिसून येत आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणांची शासनाने चौकशी करुन नागरिकांना व शाळकरी मुलांना व्यसनाधीन होण्यापासून रोखण्यासाठी तसेच यात दोषी असणारे विक्रेते व प्रशासकीय अधिकारी/कर्मचारी यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलबांची कारणे काय आहेत ?

**श्री. धर्मरावबाबा आत्राम :** (१), (२) व (३) हे खरे नाही.
(४) शाळकरी मुलांना व्यसनाधीन होण्यापासुन रोखण्यासाठी शालेय शिक्षण विभागामार्फत दि.१० फेब्रुवारी २०२१ रोजीच्या परिपत्रकानुसार सर्व शैक्षणिक संस्थामध्ये तंबाखूमुक्त शाळा धोरण, २०२० राबविण्यात येत आहे.

तसेच, अन्न व औषध प्रशासनामार्फत अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ अंतर्गत गुटखा, पान मसाला, सुगंधित तंबाखू, सुगंधित सुपारी व तत्सम पदार्थास २० जुलै २०१२ पासून १ वर्षाच्या कालावधीसाठी प्रतिबंध घालण्यात येत आहे. त्यानुसार दि.१८.०७.२०२३ रोजीच्या अधिसूचनेअन्वये राज्यात गुटखा, पान मसाला, सुगंधित तंबाखू, सुगंधित सुपारी व तत्सम पदार्थास उत्पादन, विक्री, वितरण, साठा, वाहतूक साठी प्रतिबंध घालण्यात आलेला आहे.

अन्न व औषध प्रशासनाने ०१ एप्रिल २०२३ ते २४ नोव्हेंबर २०२३ या कालावधीत एकूण ६७६ ठिकाणी कारवाई करून ४७० गुन्हे पोलिसात नोंदविण्यात आले असून ९५ वाहने जप्त करण्यात आलेले आहेत तसेच ४१३ आस्थापना सील करण्यात आलेल्या आहेत. याप्रकारे एकूण रुपये १७ कोटी ६४ लाख ७६ हजार ६७४ किंमतीचा प्रतिबंधित साठा जप्त करण्यात आलेला आहे व ७०९ आरोपीना पोलीसांमार्फत अटक करण्यात आलेली आहे.

तसेच, The Cigarettes and Other Tobacco Products Act, २००३ (COTPA) मधील कलम ४ अंतर्गत ०१ एप्रिल २०२३ ते १५ नोव्हेंबर २०२३ या कालावधीत २१३ प्रकरणी कारवाई करून रू.४४९९९/- इतका दंड वसूल करण्यात आला आहे. तसेच, कलम ६ अन्वये एकूण ९ प्रकरणी कारवाई करून १८०० रुपये दंड वसूल करण्यात आला आहे. तसेच, कलम ७ अन्वये एका प्रकरणी रू.२३१० किंमतीचा साठा जप्त करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## मुंबईतील दोन व्यापाऱ्यांनी बनावट देयके तयार करुन केलेला गैरव्यवहार

**(१६) * ७१७३४ श्री.लहू कानडे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील दोन व्यापाऱ्यांनी सुमारे १६५ कोटी ७८ लाख रुपयांची बनावट देयके तयार करुन शासनाच्या तिजोरीतून २७ कोटी ७४ लाख रुपयांचे जीएसटी इनपुट टॅक्स क्रेडिट मिळवून गैरव्यवहार केल्याचे दिनांक ७ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी दोषींना राज्य वस्तू व सेवा कर विभागाच्या अधिकाऱ्यांनी अटक केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार :** (१) सदर दोन्ही प्रकरणात करण्यात आलेल्या तपासानुसार प्रथमदर्शनी बनावट देयके तयार करुन जीएसटी ईनपुट टॅक्स क्रेडिटचा गैरव्यवहार केल्याचे आढळून आले आहे.

यामधील पहिल्या प्रकरणात श्री.राहूल व्यास (मालक व संचालक) या व्यापाऱ्याने १२० कोटी ८६ लाख रुपयांची बनावट देयके तयार करुन २० कोटी ७८ लाख रुपायांचे इनपुट टॅक्स क्रेडिट संदर्भातील गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले आहे.

तसेच दुसऱ्या प्रकरणात श्री.विकी अशोक कंसारा (मालक व संचालक) या व्यापाऱ्याने ४४ कोटी ९२ लाख रुपयांची बनावट देयके तयार करुन ६ कोटी ८६ लाख रुपयांचे इनपुट टॅक्स क्रेडिट संदर्भातील गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) वरील दोन्ही प्रकरणातील श्री.राहुल व्यास आणि श्री.विकी कंसारा यांना वस्तु व सेवाकर कायदा, २०१७ च्या कलम ६९ नुसार अटक करुन मा.मुख्य महानगर दंडाधिकारी न्यायालय, मुंबई यांचे समोर हजर केले असता मा.न्यायालयाने संबधितांना न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. तसेच या प्रकरणातील पुढील तपास सुरु असून, कायदेशीर कार्यवाहीची प्रक्रिया सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## "मोदी आवास" घरकुल योजनेंतर्गत इतर मागास व विशेष मागास प्रवर्गातील लाभार्थ्यांना घरकुल मंजूर करण्याबाबत

**(१७) * ७२७२५ ॲड.आशिष जयस्वाल (रामटेक), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा) :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने राज्यातील इतर मागास व विशेष मागास प्रवर्गातील लाभार्थ्यांसाठी येत्या ३ वर्षात १० लक्ष घरे पुर्ण करण्यासाठी "मोदी आवास" घरकुल योजना सुरू केली असून सन २०२३-२४ या वर्षाकरिता ३ लक्ष उद्दिष्ट ठरविले असतानाही अद्याप एकही लाभार्थ्यास घरकुल मंजूर करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात मोठ्या प्रमाणात इतर मागास व विशेष मागास प्रवर्गातील लाभार्थी घरकुलाच्या प्रतिक्षेत असतानाही जिल्हानिहाय उद्दिष्टाअभावी पात्र लाभार्थी या योजनेपासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्हानिहाय उद्दिष्ट मंजूर करण्याबाबत लोकप्रतिनिधींकडून मागणी होऊनही शासन स्तरावरून कार्यवाही प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे :** (१), (२) व (३) "मोदी आवास" घरकुल योजनेंतर्गत सन २०२३-२०२४ या वर्षाकरीता दि. ९.१०.२०२३ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आलेले ३ लक्ष घरकुलांचे जिल्हानिहाय उद्दिष्टे संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, महाराष्ट्र राज्य यांच्या कार्यालयाकडून सर्व जिल्हयांना वाटप करण्यात आले आहेत. ग्रामविकास विभाग यांचे दि.१६.१०.२०२३ च्या पत्रानुसार जिल्हास्तरावर घरकुल मंजूरीची प्रक्रिया सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हिंगणा (जि. नागपूर) पोलिस ठाण्याच्या हद्दीत एका महाविद्यालयीन विद्यार्थिनीवर करण्यात आलेला अत्याचार

**(१८) * ७२७३८ श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगणा (जि.नागपूर) पोलिस ठाण्याच्या हद्दीत वर्धा मार्गावर एका १९ वर्षीय महाविद्यालयीन विद्यार्थिनीला कुऱ्हाडीचा धाक दाखवुन दिवसा अत्याचार केला असल्याची घटना दिनांक ५ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्या सुमारास घडली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने संबंधित दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, नागपूर शहरात अशा प्रकारच्या घटनांची पुनरावृत्ती होऊ नये याकरिता कोणत्या उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) सदर प्रकरणी पोलीस ठाणे, हिंगणा, नागपूर शहर येथे गु.र.नं. ६७१/२०२३ कलम ३७६, ३४१, ५०६(२), ५०४ भादंवि अन्वये दिनांक ०५.१०.२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्ह्यातील आरोपीस अटक करण्यात आली आहे.
(३) अशा प्रकारच्या घटनांना आळा घालण्यासाठी नागपूर शहरात एकूण ३३० निर्जन स्थळांची (हॉटस्पॉट) नोंद घेण्यात आली आहे. या निर्जन स्थळांवर (हॉटस्पॉट) पुरेशी प्रकाश व्यवस्था ठेवणे व सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबत तसेच सुरक्षा रक्षक नेमण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना पोलीस प्रशासनाकडून सूचना देण्यात आल्या आहेत.

दामिनी पथकाद्वारे अशा निर्जन स्थळांचे पेट्रोलिंग करण्यात येते तसेच शाळा, कॉलेज, वसतिगृह, झोपडपट्टी परिसरात वेळोवेळी भेटी देण्यात येऊन महिलांसंबंधी गुन्ह्यांबाबत जनजागृती करण्यात येते.

पोलीस दीदीद्वारे शाळा, कॉलेज, शिकवणी वर्ग, सार्वजनिक करमणुकीची ठिकाणे यांना भेटी देण्यात येतात तसेच महिला व दक्षता समितीची बैठक घेण्यात येऊन सर्व वयोगटातील महिला व व मुलींना संवेदनशील विषयावर मार्गदर्शन करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हवेली (जि.पुणे) तालुक्यातील अनेक गावांत वीज ग्राहकांना चुकीची वीजदेयके येत असल्याबाबत

**(१९) * ७१८५८ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे परीमंडळात जवळपास ७३ पेक्षा अधिक कंत्राटी मीटर रीडिंग एजन्सी असून त्यांचेमार्फत सुमारे ३३ लाख १५ हजार लघु दाब ग्राहकांचे मीटर रीडिंग घेण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हवेली तालुक्यात या एजन्सीच्या माध्यमातून घेतल्या जाणाऱ्या मीटर रीडिंगमध्ये फोटो अस्पष्ट असणे, फोटो आणि प्रत्यक्ष रीडिंगमध्ये तफावत आढळणे व रीडिंग न घेता ग्राहकांना चुकीची वीजदेयके देणे इत्यादी गैरप्रकार होत असल्याचे माहे ऑक्टोबर,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे ग्राहकांना नाहक आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत असून याकडे संबंधित अधिकारी देखील दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही,

पुणे जिल्हयातील हवेली तालुक्यात माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये ९९.३१ % ग्राहकांचे मीटर रिडींगचे स्पष्ट फोटो प्राप्त झाले आहेत. यामध्ये अस्पष्ट फोटोचे प्रमाण हे नगण्य आढळून आले आहे.

महावितरणकडून ग्राहकांचे वीज देयकाचे काम हे खाजगी मीटर रिडींग एजन्सीमार्फत करण्यात येते. ग्राहकांचे वीज वापराचे मीटरमध्ये मापन केलेल्या मीटर रिडींगचे फोटोनुसार वीज देयक ग्राहकांना देण्यात येते. मीटरच्या अचूक रिडींगसाठी महावितरण कंपनीचे मुख्यालय व पुणे परिमंडळाकडून एकत्रितपणे दैनंदिन पर्यवेक्षण व दरमहा रिडींगची पडताळणी करण्यात येते.

अपवादात्मक परिस्थितीमध्ये ग्राहकाची आस्थापना बंद असणे, वीज मीटर बंद असणे, वीज मीटरची जागा रिडींग घेण्यास योग्य नसणे इत्यादी कारणांमुळे त्या महिन्यात मीटर रिडींग उपलब्ध नसल्यामुळे त्या संबंधित ग्राहकांना मा. महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाच्या नियमानुसार वार्षिक सरासरी प्रमाणे त्या

महिन्याच्या वीजवापरापोटी वीज बिल देयक देण्यात येते. सदर प्रक्रियेत कोणताही प्रकारचा गैरप्रकार होत नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मराठा समाजास आरक्षण मिळण्याबाबत पुकारण्यात आलेल्या आमरण उपोषणाबाबत

**(२०) * ७१९६१ श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.राजेश एकडे (मलकापूर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.चंद्रकांत ऊर्फ राजुभैय्या रमाकांत नवघरे (बसमत), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आंतरवाली सराटी (ता.अंबड, जि.जालना) येथे श्री. मनोज जरांगे-पाटील यांनी तसेच राज्यात इतर वेगवेगळ्या ठिकाणी आमरण उपोषणे व आंदोलने सुरु करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आंदोलनाला हिंसक वळण लागून त्यात पोलीस जखमी होणे तसेच पोलिसांनी केलेल्या लाठीहल्ल्यामुळे हजारो आंदोलक गंभीररित्या जखमी झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिनांक १४ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास आंदोलनस्थळी भेट देऊन लाठीहल्ला करणाऱ्या पोलिसांना निलंबित करुन कारवाई करणे, आंदोलन कर्त्यांवरील गुन्हे मागे घेणे, कुणबी समाजास प्रमाणपत्र देऊन एक महिन्यात मराठा समाजास आरक्षण देण्याच्या अटी शर्ती व आश्वासनावर आमरण उपोषण मागे घेण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी राज्यात अनेक ठिकाणी नागरिकांनी आत्महत्या केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(५) तसेच आंदोलनाने हिंसक वळण घेऊन राज्यात अनेक ठिकाणी जाळपोळ, दगडफेक करुन सार्वजनिक मालमत्ता आणि राजकीय नेत्यांची घरे, कार्यालये तसेच हॉटेलस् यांची जाळपोळ करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, या संपुर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करुन शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) (अ) जालना जिल्ह्यात सदर आंदोलनादरम्यान हिंसक जमावाकडून केलेल्या दगडफेकीत ७९ पोलीस अधिकारी व अंमलदार जखमी झालेले आहेत तर पोलीसांनी बचावात्मक पध्दतीने वाजवी बळाचा वापर केल्यामुळे जमावातील ५० आंदोलक जखमी झालेले आहेत.

(ब) नांदेड जिल्ह्यात पो.स्टे.कुंटूर हद्दीत मो.कृष्णूर येथे नांदेड ते देगलूर राज्य मार्गावर आंदोलनास हिंसक वळण लागून ४ पोलीस अधिकारी व १० पोलीस अंमलदार जखमी झाले आहेत.

(क) बीड जिल्ह्यात झालेल्या आंदोलनास हिंसक वळण लागून ३ पोलीस अधिकारी व ३ अंमलदार जखमी झाले आहेत.

(३) मराठा आंदोलनातील आंदोलनकर्त्यांवर झालेल्या लाठीचार्ज प्रकरणी अपर पोलीस अधीक्षक, जालना, उपविभागीय पोलीस अधिकारी, अंबड व सहायक पोलीस निरीक्षक तथा प्रभारी, गोंदी पोलीस ठाणे यांना निलंबित करण्यात आले आहे.

मराठा आंदोलनादरम्यान दाखल झालेले गुन्हे मागे घेण्याच्या अनुषंगाने तपासणी करुन आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.

मराठा-कुणबी, कुणबी मराठा जातीचे जात प्रमाणपत्र देण्याची कार्यपध्दती विहित करण्यासाठी निवृत्त न्यायमुर्ती यांचे अध्यक्षतेखाली सामान्य प्रशासन विभागाच्या दि.०७.०९.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये समिती स्थापन करण्यात आली. दि.१४.०९.२०२३ रोजी मा.मुख्यमंत्री महोदयांच्या उपस्थितीमध्ये उपोषण मागे घेतेवेळी त्यांनी सदर समितीवर श्री.जरांगे-पाटील किंवा त्यांच्या प्रतिनिधींची नियुक्ती करण्यात येईल असे आश्वासन दिले.

(४) मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मुंबई, छत्रपती संभाजीनगर, हिंगोली, धाराशिव, जालना, बीड, अहमदनगर, लातूर, नांदेड व परभणी या ठिकाणी आत्महत्या तसेच अकस्मात मृत्यूच्या नोंदी दाखल आहेत.

(५) सदर आंदोलनाच्या अनुषंगाने राज्यातील पुणे शहर, सोलापूर शहर, कोल्हापूर, सांगली, जालना, धाराशिव, यवतमाळ, नांदेड, परभणी व अहमदनगर या ठिकाणी शासकीय वाहनांवर दगडफेक, एसटी बसेसवर दगडफेक व बसेसच्या काचा फोडणे तसेच घनसावगी हद्दीत पंचायत समिती कार्यालय पेटवून देणे, तसेच विविध ठिकाणी जाळपोळ करुन सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करणे अशा घटना घडलेल्या आहेत. सदर घटनांच्या अनुषंगाने गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(६) जालना जिल्ह्यातील मौजे आंतरवाली सराटी येथे मराठा आंदोलनादरम्यान दि.०१.०९.२०२३ रोजी झालेल्या लाठीचार्ज प्रकरणात अपर पोलीस महासंचालक (का. व सु.) यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमण्यात आली होती. चौकशी समितीने दिलेल्या अहवालानुसार,

(अ) जिल्हा पोलीस अधीक्षक, जालना यांना सक्तीच्या रजेवर पाठविण्यात आले होते. त्यानंतर त्यांची जिल्हाबाहेर बदली करण्यात आली आहे.

(ब) अतिरिक्त पोलीस अधीक्षक, जालना, उप विभागीय पोलीस अधीक्षक, अंबड व सहायक पोलीस निरीक्षक तथा प्रभारी, गोंदी पोलीस ठाणे, जालना यांना निलंबित करण्यात आले असून त्यांच्याविरुध्द विभागीय चौकशीचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

मराठा आंदोलनादरम्यान दाखल झालेले गुन्हे मागे घेण्याच्या अनुषंगाने तपासणी करुन आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महात्मा जोतीबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्थेने महत्वाच्या परिक्षांसाठी देण्यात येणारी आर्थिक सहाय्य योजना अद्याप सुरु न केल्याबाबत

**(२१) * ७१७९९ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम), श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या बार्टी आणि सारथीकडून महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रीकी, विदयुत अभियांत्रिकी, निरीक्षक वैद्यमापन शास्त्र, अन्न व औषध प्रशासकीय सेवा मुख्य परीक्षा या परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थांना आर्थिक सहाय्य दिले जात असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जे उमेदवार वरील सेवांची पूर्व परीक्षा उत्तीर्ण झाले असतील त्यांना मुख्य परीक्षेच्या तयारीसाठी १५०००/- रुपयांचे आर्थिक सहाय्य दिले जाते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मागासवर्गीयांसाठी कार्यरत असलेल्या महात्मा जोतीबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्थेकडून वारंवार निधीच्या कमतरतेची कारणे देत महत्वाच्या परीक्षांसाठी अद्यापही आर्थिक सहाय्य योजना सुरु न केल्याने विद्यार्थी लाभापासून वंचित राहत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली तसेच बार्टी व सारथीच्या धर्तीवर महाज्योतीच्या विद्यार्थ्यांनाही आर्थिक सहाय्य योजना सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे :** (१) व (२) होय, हे खरे आहे
(३) व (४) हे खरे नाही.

महाज्योती संस्थेकडून दि.१०/१०/२०२३ पासून सदर योजनांचा लाभ देण्याकरीता महाज्योतीने जाहीरात प्रसिध्द करुन दि. २०/११/२०२३ पर्यत महाज्योतीच्या संकेतस्थळावर इच्छुक उमेदवाराकडून अर्ज मागविलेले आहेत.
त्यानुसार पुढील कार्यवाही सुरू आहे.

सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाकरीता महाज्योती संस्थेसाठी रु. २६९/- कोटी इतक्या रकमेची पुरवणी मागणी प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही

-----------------

**अघई (ता.शहापूर, जि.ठाणे) येथे राहणाऱ्या अल्पवयीन मुलीवर झालेला अत्याचार**

**(२२) * ७२०७९ श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अघई (ता. शहापूर,जि. ठाणे) येथे राहणाऱ्या एका अल्पवयीन मुलीवर पाच जणांनी लैंगिक अत्याचार केल्याचे दिनांक २० ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) सदर प्रकरणी दि.१९.१०.२०२३ रोजी शहापूर पोलीस ठाणे, जि. ठाणे ग्रामीण येथे गु.र.क्र.३७१/२०२३, कलम ३७६ (२) (न), ३७६ (ड) भा.द.वि.सह पोक्सो कलम ४, ६ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात ५ आरोपींना अटक केली असून त्यातील ४ विधी संघर्षग्रस्त बालक आहेत. एका आरोपीस न्यायालयीन कोठडी मंजूर करण्यात आली आहे. तसेच ४ विधी संघर्षग्रस्त बालकांना बालसुधारगृह, भिवंडी येथे ठेवण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**जाहिरीतीमधून जुगार खेळण्यासाठीचे आवाहन करणाऱ्या जाहिरातींवर बंदी आणण्याबाबत**

**(२३) * ७२९०० ॲड.आशिष जयस्वाल (रामटेक), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.जयकुमार गोरे (माण), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात रम्मी सर्कल, जंगली रम्मी, तीन पत्ती व ए-२३ या सारख्या ऑनलाईन गेमच्या विळख्यात मोठ्या प्रमाणात तरुण पिढी अडकून आर्थिकदृष्ट्या उद्‌ध्वस्त होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासाठी प्रसिध्द अभिनेते, खेळाडू, सुप्रसिध्द व्यक्ती तसेच चॅनलच्या माध्यमातून जाहिरातीद्वारे आवाहन करुन युवकांना आकर्षित करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या खेळांसाठी विद्यार्थी आणि तरुणपिढी घरातील संपत्ती विक्री करणे, गुन्हेगारी स्वरुपाची कृत्ये करणे, नैराश्य, आत्महत्या अशा प्रवृत्तीकडे वळत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या गंभीर प्रकरणी शासनाने चौकशी करुन अशाप्रकारच्या ऑनलाईन गेमवर बंदी आणणे तसेच याचा प्रसार करणाऱ्या व्यक्तींवर कारवाई करणेसदंर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.
(२) होय, हे खरे आहे.
(३) ऑनलाईन खेळासाठी विद्यार्थी व तरुणपिढीने घरातील संपत्ती विक्री करणे व नैराश्य याबाबतच्या गुन्ह्यांची नोंद आढळून येत नाही. तथापि, ऑनलाईन रमीमध्ये पैसे हरल्यामुळे व मानसिक तणावामधून चंद्रपूर जिल्हयात एका इसमाने पत्नीची हत्या करून स्वत: आत्महत्या केली आहे; ऑनलाईन रमीमध्ये पैसे हरल्याने ठाणे शहर येथे ०२ व रायगड जिल्ह्यामध्ये ०१ इसमाने; नाशिक ग्रामीण येथे रौलेट नावाच्या जुगारात पैसे हरल्याने ०२ इसमांनी, तसेच गोंदिया येथे ऑनलाईन गेमिंग व बेटिंगमध्ये पैसे हरल्याने एका इसमाने आत्महत्या केली आहे. यासंदर्भात भादवि कलम ३४, ३०२, ३०६, ४२०, सीआरपीसी १७४ अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.
(४) मुंबई शहराच्या सायबर विभागामार्फत पोलीस उपआयुक्त सायबर गुन्हे, मुंबई यांचेकडून गेमकिंग इंडिया या कंपनीच्या www.gamekingindia.com व www.planetgoline.com या वेबसाईट बंद करण्यात आल्या आहेत. ऑनलाईन गेमिंगवर आळा घालण्याच्या अनुषंगाने माहिती तंत्रज्ञान कायदा, २०००, महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम, १८७७ अन्वये केलेल्या कारवाईचा तपशील खालीलप्रमाणे :-

| सन | एकूण दाखल गुन्हे | अटक आरोपी |
|---|---|---|
| २०२१ | २५ | ३७ |
| २०२२ | ०८ | ११ |
| २०२३ | ०३ | ०४ |

ऑनलाईन गेममधून युवकांची फसवणूक होऊ नये म्हणून विविध जिल्हयातील पोलीस अधिकारी/ कर्मचारी यांनी १९५८ शाळा / महाविदयालयात नियमितपणे भेटी देऊन ऑनलाईन गेमिंग तसेच जुगाराच्या संदर्भात ३,५३,५९१ विदयार्थी, शिक्षक, पालक, सामान्य लोक यांच्यात जनजागृती केली आहे. ऑनलाईन गेमवर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने केंद्र सरकारच्या इलेक्ट्रॉनिक्स व माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत माहिती

तंत्रज्ञान कायद्याअंतर्गत Information Technology (Intermediary Guidelines and Digital Media Ethics Code) Rules, २०२१ दिनांक ०६/०४/२०२३ रोजी भारताच्या राजपत्रामध्ये प्रसिद्ध करण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**नागपूर.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (१) (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.